# अर्थशास्त्राचे तत्त्वांचा जीवनात अवलंब करा : डॉ. राराविकर

## के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे व्याख्यानमाला

नाशिक, ता. १५ : अर्थशास्त्र ही संपूर्ण ज्ञानाची गुरुकिल्ली आहे. जीवनाच्या गरजा पूर्ण करणारे व सुख समृद्धीचे महामार्ग दाखविणारे, असे हे शास्त्र आहे. अर्थशास्त्रातील तत्त्वांचा अवलंब करत जीवन सुखकर करावे, असे प्रतिपादन अर्थतज्ज्ञ व लेखक डॉ. आशुतोष राराविकर यांनी शनिवारी (ता. १५) केले. के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे आयोजित पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ व्याख्यानमालेत ते बोलत होते.

'चिरंतन आशा अर्थशास्त्राची' असा व्याख्यानाचा विषय होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. विनायक गोविलकर होते. डॉ. राराविकर म्हणाले, की जीवनात योग्य निर्णय घेणे महत्त्वाचे असून, अर्थशास्त्रातून हे शिकायला मिळते. जगताना निरंतर आशा व सकारात्मक मन ठेवणे आवश्यक आहे. सध्या कोरोना महामारीमुळे नकारात्मक वातावरण तयार झालेले आहे. परंतु यापूर्वीदेखील जग अशा आव्हानात्मक स्थितीमधून बाहेर पडले आहे. तसे या समस्येतूनही आपण नक्कीच मुक्त होऊ, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. वेळेचा सद्उपयोग व योग्य नियोजन करणे महत्त्वाचे आहे. वेळ ही घालविण्याची नाही, ती वाचविण्याची, मिळविण्याची गोष्ट आहे. देशाच्या अर्थकारणाचे किमान ज्ञान प्रत्येकाला असले पाहिजे. यासंदर्भात आर्थिक साक्षरता महत्त्वाची आहे. अर्थशास्त्राचे ज्ञान मिळविणे व ते अद्ययावत करत राहण्याचा सल्ला त्यांनी दिला.

प्रास्ताविकात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी संस्थेची वाटचाल व यशस्वीतेचे टप्पे विशद केले. आजवर सत्तरहून अधिक व्याख्यानातून वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांनी मार्गदर्शन केल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋतुजा जाधव यांनी केले.

### 'अर्थकारणाचे चक्र सुरळीत व्हावे'

अध्यक्षीय भाषणात डॉ. गोविलकर म्हणाले, की भारताची अर्थव्यवस्था बचतीच्या सिद्धांतावर आधारलेली आहे. परंतु, अलीकडील काळात अर्थकारणाचे चक्र पूर्णपणे बिघडले आहे. गरज, मागणी, पुरवठा व उत्पादन यांच्यात समन्वय राहिलेला नाही. मागणी नसतानाही उत्पादन वाढविले जाते व वाढीव उत्पादन मार्केटिंगच्या माध्यमातून बाजारपेठेत दाखल केले जाते. आर्थिक उत्थान झाले म्हणजे माणूस सुखी झाला, असे मुळीच नसल्याचे त्यांनी नमूद केले.

आपलं महानगर



# K. K. Wagh Education Society

Central Office: Hirabai Haridas Vidyanagari, Amrutdham,
Panchavati, Nashik-03.
Ph. No. (0253)2221106, 2221109,2221111
Mail Id: disp-co@kkwagh.edu.in Website : www.kkwagh.edu.in



**वैशिष्ट्ये:**

- गेली ५० वर्षे गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रदान करणारी संस्था. के.जी. पासून पी.एच.डी. पर्यंत विविध शाखांमध्ये शिक्षणाची सोय.
- अभियांत्रिकी महाविद्यालयातील नऊ (९) शाखांना व तंत्रनिकेतनच्या चार (४) शाखांना NBA कडून मानांकन प्राप्त.
- अभियांत्रिकी महाविद्यालयास NAAC द्वारा 'अ' श्रेणी प्राप्त.
- रोजगार व उच्च शिक्षणाच्या उत्तम संधी उपलब्ध करुन देणारी संस्था.
- राष्ट्रीय स्तरावरील AICTE- CII सर्व्हेक्षणाद्वारे अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतनास ४ वेळा 'Platinum Category' (सर्वोत्कृष्ट दर्जा) प्राप्त.
- ६ विविध विद्याशाखांमध्ये कृषी शिक्षण प्रदान करणारी महाराष्ट्रातील सर्वात मोठी संस्था.
- अभिजात भारतीय कला जोपासणारी – 'ललितकला व प्रयोगजिवी कला शिक्षण' महाविद्यालये.
- विद्यार्थी विकास केन्द्रीत शिक्षणावर भर देणारी संस्था.
- AICTE – Idea Lab साठी अनुदान मिळवणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील एकमेव अभियांत्रिकी महाविद्यालय.
- सन २०२२–२३ पासुन विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) नवी दिल्ली कडुन अभियांत्रिकी महाविद्यालयास स्वायत्त दर्जा प्राप्त.

## नवीन विद्याशाखा शैक्षणिक वर्ष २०२१–२२ पासून परवानगी

- अभियांत्रिकी महाविद्यालया अंतर्गत Computer Science & Design
- तंत्रनिकेतन अंतर्गत Artificial Intelligence & Machine Learning
- औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, नाशिक अंतर्गत Diploma in Pharmacy
- के.के.वाघ ललितकला महाविद्यालय, नाशिक अंतर्गत BVA (Painting & Sculpture)



**दै. आपलं महानगर च्या वर्धापन दिनास**

# हार्दिक शुभेच्छा..!

*** शुभेच्छूक ***

**श्री. बाळासाहेब वाघ**, अध्यक्ष
**के. के. वाघ शिक्षण संस्था**, नाशिक, विश्वस्त, प्राचार्य,
शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद व विद्यार्थी

## Constituents of K. K. Wagh Education Society

| | | |
|---|---|---|
| Engineering | Agriculture & Allied Colleges | Schools (CBSE) |
| MBA/MCA | Pharmacy (B. Pharm. & D. Pharm) | Schools (SSC) |
| Polytechnic | B.Ed./Nursing | Schools (Marathi Mediun) |
| Arts, Commerce & Science Colleges | Fine Arts/Performing Arts | Well Equipped Boys & Girls Hostels |

आपलं महानगर

# के. के. वाघ : सर्वस्पर्शी शिक्षणप्रदान करणारी संस्था

**सतत परिश्रम, सृजनशीलतेचा ध्यास, काळाची पावल ओळखण्यासाठी असलेली दूरदृष्टी या सर्व गुणांनी परिपक्व असलेला ८९ वर्षांचा हा चिरतरुण युवा अध्यक्ष भारतीय संस्कृतीतल्या संयमशीलतेच महत्त्व जाणून आहे. म्हणूनच, या प्रांगणतला युवा उच्छःखल नाही, स्वच्छंद आहे पण उन्मुक्त नाही. त्यांची समाजाविषयीची कळकळ, मातीशी घट्ट नाते, व्यवहार कुशलता, कमालीचा साधेपणा, दूरदृष्टी या गुणांच्या संगमातून या संस्थेने आपलं स्वतःच मूल्याधिष्ठीत वेगळेपण राखलेले आहे. म्हणून आणि म्हणूनच इतरांपेक्षा वेगळी आणि सर्वस्पर्शी शिक्षणप्रदान करणारी संस्था म्हणजेच के. के. वाघ शिक्षण संस्था आहे.**

**पद्मश्री** कर्मवीर काकासाहेब वाघ एक समाजाभिमुख, राष्ट्र कार्याला समर्पित व सर्वार्थाने समाजन्नोतीसाठी प्रयत्नरत असलेले समाजपुरूष होते. काळाची पावले ओळखून समाजाला योग्य दिशेने नेणारे पुरोगामी नेते होते. शिक्षण हा समाजाच्या सर्वांगिण विकासाचा पाया आहे, अशी त्यांची धारणा होती. त्या धारणेला अनुसरून ग्रामीण विभागाच्या उत्थानासाठी सन १९७० मध्ये त्यांनी कर्मविरांच्या प्रेरणेने क. का. वाघ शिक्षणसंस्थेची मुहूर्तमेढ रोवली.

गेल्या ५० वर्षाच्या कालावधीत संस्थेने अभियांत्रिकी आणि तंत्रशिक्षणाच्या विकासावर लक्ष केंद्रीत करून अभियांत्रिकी व तंत्रज्ञान क्षेत्रात महाराष्ट्रातच नव्हे तर देशाच्या क्षितीजावर गुणवत्तेने परिपुर्णसंस्था असा नावलौकीक मिळवला आहे. नुकतेच केंद्रीय मनुष्यबळ खात्याने जाहीर केलेल्या मानांकनात के. के.वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाला राज्यात ९ वा तर संपुर्ण देशात ८५ वा क्रमांक मिळला. संस्थेच्या विकासाचा वारू अभियांत्रिकी व तंत्रज्ञान क्षेत्रापुरता मर्यादित न राहता पारंपारिकशिक्षणाबरोबर ललितकला,शिक्षणशास्त्र, परिचारीका (नर्सिंग) व कृषी विज्ञानाच्या क्षेत्रात ही आपली चुणूक दाखवत आजमितीस एकूण ३५ वेगवेगळयासंस्थाची गरुड झेप घेत विकासाच्या मार्गावर अग्रेसर आहे. व्यवसायिक व पारंपारिकशिक्षणाच्या अनेकविध विद्याशाखांमध्येशिक्षणप्रदान करीत असतांना कलेच्या प्रांतातही संस्थेने के.के.वाघ कला अकादमी अंतर्गत फाईन आर्टस् व परफॉर्मिंग आर्टस महाविद्यालय सुरू करून नवा पायंडा घातला आहे. संगीत, नृत्य, नाटक व प्रयोगजिवी कला या विभागात पदवीपर्यंतचेशिक्षणप्रदान करणारी ही एकमेवसंस्थाआहे. सी.बी.एस.ई.शिक्षणप्रणालीच्या शाळा सुरू करून संस्थेने अद्ययावतशिक्षणव्यवस्थेचा पायंडा निर्माण केलेला असतांनाच चालू शैक्षणिक वर्षापासून संस्थेने नाशिक येथे बी.फार्मसी महाविद्यालय सुरू करून वैद्यकियशिक्षणाच्या क्षेत्रात नवीन हस्ताक्षर केले आहे.

सध्या संस्थेच्या विविध शाखांमध्ये २१,००० विद्यार्थीशिक्षणघेत असुन १,९०० कर्मचारी वर्ग आपल्या अहोरात्र परिश्रमाने हया शारदेचा ज्ञानरथास गतिशिल करण्यास प्रयासरत आहेत. संस्थेचे विद्यमान अध्यक्ष मा.बाळासाहेब वाघ यांच्या विचारधारेने व प्रेरणेने भारतीय संस्कृतीच्या भरभक्कम आधारशिलेवर काळाचे आव्हान पेलण्यास समर्थ युवा निर्माण करण्याकामी ही एक निरंतर प्रक्रिया



आहे. नाशिक जिल्ह्यात सर्वात मोठे बांधकाम क्षेत्र असलेल्या या इमारतीत २००६ पासून प्रॉडक्शन, इलेक्ट्रीकल, सिव्हील, कॉम्प्युटर, इलेक्ट्रॉनिक्स या विद्याशाखेत एम.ई च्याशिक्षणाच्या सुविधा बरोबर एम.सी.ए. व एम. बी. ए. शिक्षणाचीही व्यवस्था केली आहे. याशिवाय इलेक्ट्रीक, सिव्हिल, प्रॉडक्शन व कॉम्प्युटर या चार विद्याशाखेत संशोधन ज्ञानशाखा (पीएच.डी.) कार्यरत आहेत. ८० सुसज्ज अत्याधुनिक प्रयोगशाळा, महाविद्यालयातील नेटवर्कद्वारे जोडलेले १४०० संगणक, इंटरनेट सुविधा या सर्वांबरोबरच संस्थेच्या प्रत्येक महाविद्यालयात स्वतंत्र ग्रंथालये असून अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या 'कुसुमाग्रज' ग्रंथालयात ८५ हजारांहून अधिक पुस्तके २६८ राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय जर्नल्स/मासिके उपलब्ध आहेत. याशिवाय ई-लायब्ररी, ई-जनरल्स् यांसारख्या सुविधांसह इकोग्रंथालयाची संकल्पना इथे साकार झालेली आहे.

(उर्वरित पान.३)


GGSF

GURU GOBIND SINGH FOUNDATION

(Education is the key to success | Educating children and youth | Enlightenment is a door to achieve goal)

Guru Gobind Singh Foundation was established way back in 1978 by Sikh Community of NASHIK with motto of providing best education to student without any discrimination of caste, religion and status at economical cost. GGSF emphasis on educating the students and provide the application of knowledge in various life skills and values to become better citizen. A lush green campus centrally located at Nasik having School, Polytechnic and Degree Engineering College. All Institutes having world class infrastructure, well equipped education facilities with the backbone of strong and eminent teaching fraternity.

- ON JOB TRAINING AT CAMPUS -

The Visionary management of GGSF, Nashik not only provides the quality education as per the curriculum of affiliated Board / University to the Diploma/Degree Engineering students but also focuses on the value adding Industry relevant skill trainings so that they can secure better employment immediately after the graduation

**Engineering** Affiliated to SPPU Pune

Guru Gobind Singh College of Engineering & Research Centre

Four Year Degree Courses Offered (DTE Code:5418)

| Branch | Intake |
|---|---|
| Civil Engineering | 60 |
| Computer Engineering | 120 |
| Electrical Engineering | 60 |
| Mechanical Engineering | 60 |
| Electronics & Computer Engineering* | 60 |
| Artificial Intelligence & Data Science* | 120 |
| Robotics & Artificial Intelligence* | 60 |

*Proposed under BATU Lonere

**Polytechnic** Affiliated to MSBTE, Mumbai

Guru Gobind Singh Polytechnic

Three Year Diploma Courses Offered (DTE Code:5240)

| Branch | Intake |
|---|---|
| Civil Engineering | 90 |
| Computer Engineering | 120 |
| Electrical Engineering | 60 |
| Electronics & Telecommunication Engineering | 60 |
| Mechanical Engineering | 150 |
| Mechatronics Engineering | 60 |
| Artificial Intelligence & Machine Learning* | 60 |

*Proposed

Guru Gobind Singh

**Public School & Junior College**

Stream : Science | Intake: 160

Contact Engineering 98810 03790 | 88066 64601 | 96899 08274

Contact Polytechnic 99218 42984 | 84118 87175 | 99211 20177

Contact Junior College 98268 56720 | 86982 86540

We Transform Youngsters.... By Creating Intellectuals and Innovative Learners with social Commitment.

/ggsfnashik Website: www.ggsf.edu.in

Our Training & Placement Partners

NRACCA.com



नाशिक : के. के. वाघ संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांचा सत्कार करताना भारतीय उद्योग महासंघाचे पदाधिकारी.

# भारतीय उद्योग महासंघातर्फे वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाचा सन्मान

**नाशिक :** येथील के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालयास विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) नवी दिल्ली यांच्यातर्फे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ते २०३१-३२ या दहा वर्षांकरिता 'ऑटोनॉमस' अर्थात 'स्वायत्त' महाविद्यालयाचा दर्जा मिळाला आहे. त्या पार्श्वभूमीवर भारतीय उद्योग महासंघाच्या महाराष्ट्र शाखेचे चेअरमन सुधीर मुतालिक, माजी चेअरमन गणेश कोठावदे, नाशिक विभागाचे उपाध्यक्ष मनोज देशमुख यांनी संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांची सदिच्छा भेट घेत अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्थेचे सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य प्रा. डॉ. के. एन. नांदूरकर, प्रा. पी. टी. कडवे, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर आदी उपस्थित होते.

**Pudhari**
**07-01-2022**

आपलं महानगर

न्यूज Short



# उद्योग महासंघातर्फे के. के. वाघ अभियांत्रिकीचा गौरव

नाशिक । कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालयास विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे १० वर्षांकरीता 'स्वायत्त' महाविद्यालयाचा दर्जा मिळाला आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय उद्योग महासंघाच्या महाराष्ट्र शाखेचे चेअरमन सुधीर मुतालिक, माजी चेअरमन गणेश कोठावदे, नाशिक विभागाचे उपाध्यक्ष मनोज देशमुख यांनी अभियांत्रिकी महाविद्यालय येथे संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांची सदिच्छा भेट घेत शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी संस्थेचे सचिव प्रा. के. एस. बंदी, अभियांत्रिकीचे प्राचार्य प्रा. डॉ. के. एन. नांदुरकर, तंत्रनिकेतनचे प्राचार्य प्रा. पी. टी. कडवे, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के शहाबादकर आदी उपस्थित होते.

आपलं महानगर ,
०६-०९-२०२२

# वाघ अभियांत्रिकीला स्वायत्त महाविद्यालय दर्जा

## संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांचा सत्कार

**सकाळ वृत्तसेवा**

पंचवटी, ता. ५ : येथील के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालयास विद्यापीठ अनुदान आयोगाकडून दहा वर्षांकरिता स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा मिळाला आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय उद्योग महासंघाच्या महाराष्ट्र शाखेचे अध्यक्ष सुधीर मुतालिक, माजी अध्यक्ष गणेश कोठावदे, नाशिक विभागाचे उपाध्यक्ष मनोज देशमुख यांनी अभियांत्रिकी महाविद्यालयात संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांची भेट घेत त्यांचे व त्यांच्या महाविद्यालयाचे अभिनंदन करीत सत्कार केला.

याप्रसंगी संस्थेचे सचिव प्रा. के. एस. बंदी, अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, तंत्रनिकेतनचे प्राचार्य प्रा. पी. टी. कडवे, ट्रेनिंग अँन्ड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर आदी उपस्थित होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये नाशिक विभागात वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय हे पहिले स्वायत्त महाविद्यालय असणार आहे. यामुळे जिल्ह्यातील उद्योग क्षेत्राला प्रशिक्षित व कुशल विद्यार्थी उपलब्ध होतील, असे संस्थेच्या सूत्राने सांगितले. महाविद्यालयातर्फे राबविण्यात येणारे विविध उपक्रम, संशोधन प्रकल्प, वर्ग खोल्या, अद्ययावत प्रयोगशाळा, वाचनालय, क्रीडा सुविधा आणि निवास व्यवस्था आदी सुविधा लक्षात घेऊन, तसेच पारदर्शक पद्धतीने होणारी शिक्षकांची निवड, विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया, संस्थेचे गुणवत्ता पूर्ण व्यवस्थापन आणि शैक्षणिक प्रगती या सर्व बाबी लक्षात घेऊन यूजीसीतर्फे नेमलेल्या सहा जणांच्या तज्ज्ञ समितीने के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाला स्वायत्त दर्जा देण्याबाबत शिफारस केली. त्यानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाने पुढील दहा वर्षांसाठी स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा दिला आहे.



**नाशिक : स्वायत्त महाविद्यालाचा दर्जा मिळाल्याबद्दल के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे बाळासाहेब वाघ यांचा सत्कार करताना मान्यवर.**